मुख्य कार्यालय, विरार
विरार (प),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./ /
दि.३०/०३/२०२६

***वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत नगर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक २०२६ चा निकाल जाहीर***

वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत नगर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक २०२६ करिता दिनांक २९ मार्च २०२६ रोजी मतदान झाले होते. या मतदान प्रक्रियेत एकूण २५०१ मतदारांनी मतदान केले. या मतदानाची मतमोजणी प्रक्रिया दिनांक ३० मार्च २०२६ महानगरपालिका मुख्यालयात पार पडली.

मतमोजणी प्रक्रीयेअंती सर्वसाधारण (पुरुष) संवर्गातील ०२ जागांकरिता झालेल्या निवडणुकीत *श्री.आकाश प्रकाश गुप्ता* (८२५ मते) व *श्री.निलेश दत्ताराम तेलंगे* (५७९ मते) हे सर्वाधिक मते मिळवून विजयी झाले.

सर्वसाधारण (महिला राखीव) संवर्गातील एका जागेसाठी झालेल्या निवडणुकीत *श्रीम.रुपाली संदेश पवार*(१०६३ मते) ह्या सर्वाधिक मते मिळवून विजयी झाल्या.

तसेच इतर मागास वर्ग संवर्गातील एका जागेसाठी झालेल्या निवडणुकीत *श्री.राजन अनंत म्हात्रे* (१२६१ मते) हे सर्वाधिक मते मिळवून विजयी झाले.

तत्पूर्वी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी केवळ *श्री.संतोष हरिश्चंद्र वनमाळी* यांचे एकच नामनिर्देशन पत्र प्राप्त झाल्याने त्यांची या प्रवर्गासाठी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. तसेच अ.ज., अल्पसंख्याक व दिव्यांग महिला राखीव या प्रवर्गासाठी अर्ज आलेले नसल्याने या जागांसाठी निवडणूक झाली नाही.

नगर पथविक्रेता समिती सदस्य निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांनाअजित मुठे मा.निवडणूक निर्णय अधिकारी, नगर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक, २०२६ तथा उपायुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली.